# विद्यावार्ता®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318
SPECIAL ISSUE-2020 08


Peer Reviewed International Refereed Research Journal



शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
यांच्या संयुक्त विद्यमाने

## "राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान " या विषयावर

## एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद



प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव

Scanned with CamScanner



Scanned with OKEN Scanner

# INDEX

01) Mahatma Phule: A Pioneer of Women's Emancipation and Empowerment
Dr. Anuradha Jagdale, Bhoom || 17

02) Role Of Dr. B. R. Ambedkar In Women Empowerment
Dr. Swapna C. Vyawahare, Aurangabad || 19

03) Dr. Ambedkar View's on education and teacher's role
Gadhave Priyanka Ashok, Washi || 22

04) Chhatrapati Shahumaharaj, A Social reformer ahead of His Time
Mr. Gaikwad Soham Arunrao, Solapur || 25

05) Mahatma Phule's Ideas On Social Justice
Raman Shahaji Misal, Laxman Baburao Pawar, Bhoom || 29

06) Thoughts of Dr. B. R. Ambedkar about the India's Exchange Rate Regime
Prof. Gopal Ghumatkar, Prof. Pratiksha Tikar, Mumbai || 32

07) Dr. Babasaheb Ambedkar's Financial Views
Dr. Rahul Narayanrao Hiwrale, Jalna || 36

08) Dalit Self Narratives – A Cultural Revolt
Dr. Sathe Kalyan Kacharu, Barshi || 39

09) राजर्षी शाहू महाराजांचे कृषी विषयक धोरण
प्रोफेसर–किशोरकुमार गव्हाणे, भूम || 42

10) राजर्षी शाहु महाराज
प्रा. बोराडे तानाजी रामभाऊ, प्रा. शेंडगे संदिप संभाजी, भूम || 46

11) छ. राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणीक धोरण
प्रा.डॉ. शिला स्वामी, डोंबाळे भरत सुदाम, उस्मानाबाद || 52

12) महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य
डॉ. सुखदेव शिंदे, पंढरपूर || 54

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

79

Scanned with OKEN Scanner

37) महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान
डॉ. सिद्धार्थ आगळे, पुणे ||132

38) महात्मा ज्योतिबा फुले- स्त्रियांचे उद्धारक
प्रा. शुभदा गणपतराव चांदवले, पुणे ||135

39) महात्मा फुले, आंबेडकर यांचे साहित्यातील योगदान
डॉ. सुनील पिंपळे, प्रा. मायगुडे बी. बी., औरंगाबाद ||138

40) शाहू, फुले, आंबेडकर यांचे ऐतिहासिक योगदान
डॉ. घुमरे. एल. बी, बीड ||140

41) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार
जनार्दन जानजी देवरे, जळगाव ||143

42) शाहू फुले आंबेडकर यांचे ऐतिहासिक योगदान
प्रा. राहुल सोनवणे, बीड ||145

43) छत्रपती राजर्षी शाहू महाराज व वंचित घटक
विशाल नामदेव माने, पंढरपूर ||148

44) महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य
प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु., कळंब ||151

45) शाहू, फुले, आंबेडकर यांचे सामाजिक कार्य
शिंदे एल. एस. ||153

46) राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षणविषयक विचार
चौधरी प्रदीप विनायक, औरंगाबाद ||157

47) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार
प्रा.डॉ. बालाजी खराबे, नांदेड ||159

48) राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर के आरक्षण विषयक विचार
डॉ. सविता आनंदराव भालेराव, औरंगाबाद ||161

49) महात्मा फुले, शाहू महाराज तथा डॉ. बाबासाहेब आंबेकडकर का समाज सुधार ...
प्रा. डॉ. मांडोत ज्योती पारसमल, भूम ||163

50) डॉ. बाबासाहब आंबेडकर के आर्थिक विचार
डॉ. प्रा. खरटमोल मदन नामदेव, सोलापुर ||167

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

76

स्थायिक व्हावी. असा महाराजांनी विचार केला. महाराजांनी त्यांनी भीक मागून पोट भरण्याची लाचारी सोडावी असा महाराजांनी विचार केला. महाराजांनी त्यांच्या म्होरक्याला बोलावले त्यांच्याशी चर्चा केली. पण ते आपली भटकंती जमात, बापजादे गावोगावी भटकतच होते. हीच त्यांची परंपरा, या रूडीच्या चाकोरीत राहणे हा त्यांचा स्वभावधर्म चाकोरीबाहेर पडणे. त्या डोंबारी समाजाला मान्य नव्हते. तरीही या डॉबारी समाजाला माणसात आणण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी सुरू केला. यांना कामे उपलब्ध करून दिली करवीर नगरीत व तालुक्यात तालुक्याचे ठिकाणी आणण्यात आले. त्यांना काम देण्याची व्यवस्था सरकारतर्फे करण्यात आली. करवीरनगरीत महाराजांनी स्वखर्चाने त्यांना घरे बांधून दिली. पूर्व सवयीप्रमाणे डॉबारी घर सोडून पाला कडे वळतात का.हे पाहण्यासाठी राखनदार यांच्या निवडणुका करण्यात आल्या. हळूहळू घरात राहण्याची पद्धत डॉबाऱ्याच्या अंगवळणी पडली डोंबारी समाज एका ठिकाणी स्थिर व स्थायिक झाला.

**समारोप:-** राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील दलित बांधवांना न्याय दिला व त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. सर्वांना समतेची वागणूक दिली. शाहू महाराजांचे कार्य महान होते. त्यांच्यामुळे दलित बांधवांना एक महान नेता मिळाला.

**संदर्भ :**

१. डॉ.कदम विकास,डॉ.शिंदे सुखदेव, डॉ.रविराज कांबळे.महाराष्ट्रातील समाज सुधारकाचा इतिहास, अरुणा प्रकाशन लातूर. पृ.१०२ २ १०३.

२. सुरेश कोडीतकर :- लोककल्याणकारी राजर्षी शाहू महाराज, यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे.

३. गरुड अण्णासाहेब व सावंत बी.बी महाराष्ट्रातील समाज सुधारकाचा इतिहास कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद पृ.१४६,१४७.

४. उपरोक्त पृ.६८ ते ७४.

□□□

44

# महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य

प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.
इतिहास विभाग प्रमुख,
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**********

**प्रस्तावना :**

विद्येविना मति गेली। मतिविना निती गेली।
नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले।
वित्तविना शुद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।।

भारतात ब्रिटिश कंपनीच्या राजवटीला सुरूवात झाल्यानंतर भारतातील अनेक सुधारक नावलौकिकास आले. त्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले नाव अग्रक्रमाने घेतले जाते. ते एक कर्ते समाज सुधारक म्हणून ओळखले जातात. त्यांनी सामाजिक विचारात शिक्षण विषयक विचारांना अनन्य साधारण महत्व दिले आहे. त्यांनी सामाजिक सुधारणा कार्यातील स्त्री शिक्षणाला विशेष महत्त्व दिले आहे. समाजाचे सामाजिक परिवर्तन घडून आणायचे असेल तर समाजातील सर्व जातीत सर्व पंथातील लोक शिक्षीत झाले पाहिजे, हे होत असताना यामध्ये स्त्रीयांना अग्रक्रमाने सामावुन घेतले पाहिजे. अशी धारणा महात्मा फुले यांची होती. शिक्षणाने माणसाचा सर्वांगिण विकास होतो, तो विचारशील बनुन डोळस बनतो, त्याची कोणाकडून फसवणूक अथवा शोषण होणार नाही, तसेच तो अंधश्रद्धेच्या आहारी जाणार नाही. शिक्षणाने मानवाला आपल्या विचारांच्या जोरावर आपले जीवन जगता येईल व त्यांची होणारी पिळवणूक थांबेल. तो समाज परिवर्तनासाठी तयार होईल असे फुल्यांना वाटे. त्यासाठी तत्कालीन समाजाच्या दृष्टीने किती तरी पुढचा विचार करून त्यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले होते.

**स्त्री शिक्षणाचे कार्य :**

जिच्या हाती पाळण्याची दोरी। तीच जगाते उद्धारी।।

१९ व्या शतकात महात्मा जोतीबा फुले हे स्त्रीयांच्या मानवी हक्काची मांडणी करणारे जगातील पहिले भारतीय क्रांती मानव होते. त्यांनी सार्वजनिक सत्य धर्मात प्रत्येक ठिकाणी एकंदर सर्व 'स्त्री आणि पुरूष' असा स्त्रीयांचा एक व्यक्ती म्हणून स्वतंत्र उल्लेख केला आहे. फुल्यांपूर्वी कोणीही याप्रमाणे स्पष्ट शब्दात स्त्रीयांचा मानव असल्याचा स्वतंत्र उल्लेख केलेला वा तिला तसा स्वतंत्र दर्जा दिलेला दिसून येत नाही. या संदर्भात महात्मा फुले म्हणतात, स्त्री आणि पुरूष एकसारखे एकंदर सर्व मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र असता स्त्रियास नियम लागू करणे व लोभी



Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुरूषास दुसरा नियम लागू करणे हा निव्वळ पक्षपात होय. फुल्यांच्या समकालीन समाज सुधारकांनी स्त्री समस्यांकडे एक प्रकारे 'सहानुभुतीच्याच' दृष्टीकोनातून पाहिले असल्याचे दिसते व स्त्रीयांना शिक्षण देण्याचे समर्थन त्यांनी केले. कारण शिक्षण घेऊन स्त्री आदर्श माता, पत्नी, भगिनी, कन्या बनावी असा त्यांचा हेतू होता. या उलट ज्योतिबा फुल्यांनी स्त्री समस्यांकडे एक मानवी दृष्टीने नव्हे ते जन्मदात्री असल्याने पुरूषाहून श्रेष्ठ आहे आणि मानव म्हणून तीलाही पुरूषाप्रमाणे जे 'मानवी हक्क' आहे ते मिळायलाच हवेत या जाणिवेतून तिच्या हक्काचा लढा ते लढत होते. स्त्रीयांना शिक्षीत करण्यामागे इत्तर प्रमाणे त्यांची भूमिका पारंपारिक मानसिकतेची नव्हती. शिक्षण हे गुलामी नष्ट करण्याचे हत्यार असल्याचे त्याने वाटत होते.[१] फुल्यांच्या काळात हिंदु शास्त्राप्रमाणे स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. स्त्रियांना शिक्षण दिल्यास त्या वाईट मार्गाला लागतील. त्यांना नीती-अनितीची चाड राहणार नाही. त्यामुळे कुटुंबातील स्वास्थ्य व सौख्य नष्ट होईल. या भितीपोटी स्त्रियांना शिक्षण देणे हे महापाप आहे. त्यामुळे त्या अल्पवयातच विधवा होतील. स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म आणि समाजाशी दोह करणे होय. यासारख्या अज्ञान मुलक समजुती समाजात रूढ होत्या. त्या सर्व समजुती विरूद्ध महात्मा फुले यांचे मत होते. शिक्षणाच्या अभावी स्त्रिया ह्या अज्ञानांच्या अंधकारात हजारो वर्षांपासून खितपत राहिल्या आहेत. मनुष्याला शिक्षणाने मनुष्यपण प्राप्त होते. यासाठी स्त्रियांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश आणण्याचा ज्योतिबाने ठाम निश्चय केला होता. एक स्त्री शिक्षित झाली तर सारे कुटुंब शिक्षित होते हे ओळखून ज्योतिबांनी मुलींची शाळा काढण्याचे ठरविले.[२]

महात्मा फुल्यांच्या काळात स्त्री ही सामाजिक व मानसिक गुलामगिरीत अडकलेली होती. स्त्रीयांना या गुलामगिरीतून मुक्त करावयाचे असेल तर तिला आतापर्यंत बंद असलेल्या शिक्षणाचे दरवाजे उघडले गेले पाहिजे हे फुल्यांनी ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी सन १८४८ साली ऑगस्ट महिन्यात बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात मुलीची पाहिली शाळा सुरू केली आणि स्त्री शिक्षणाला विशेष महत्त्व दिने होते. "स्त्री शिक्षित झाली तर तिचा उद्धार होईल, आत्मप्रतिष्ठा लाभेल व मानसिक गुलामगिरीतून तिची मुक्तता होईल" असा विचार महात्मा फुले यांनी केला होता. स्त्री शिक्षणाचे महत्त्व सांगताना महात्मा फुले म्हणतात, "स्त्रियांच्या शाळेने प्रथम माझे लक्ष वेधले पूर्ण विचारात माझे असे मत झाले की पुरूषाच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची अधिक आवश्यकता आहे. मुलांच्या भवितव्याचे मार्गदर्शन मातांकडून व्यवस्थित होऊ शकते. स्त्रियांना आपल्या कर्तव्याची जाणीव झाली तर देशाची प्रगती झपाट्याने होईल असे महात्मा फुले यांना वाटल्यामुळे त्यांनी स्त्री शिक्षणावर विशेष भर दिला."[३] आपल्या शिक्षण कार्यात आपली पत्नी सावित्रीबाई हिचे सहाय्य व्हावे म्हणून फुल्यांनी त्यांचेही शिक्षण सुरू केले आणि वरीलप्रमाणे कनिष्ठ वर्गाच्या मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. या मुलांच्या शाळेत ज्या मुलांना शिक्षणाची आवड असेल त्यांनाही प्रवेश दिला. त्या शाळेत वाचन, अंक गणित आणि व्याकरणाची मुलतत्त्वे हे विषय शिकविले जात असत. जोतीरावांचे सहकारी सखाराम, यशवंत परांजपे, सदाशिव गोविंद हारे व सदाशिवराव गावंडे हे त्यांना वरील शाळा चालविण्यासाठी आर्थिक सहाय्य करीत असत. पुणे हे सनातण्यांचा बालेकिल्ला होता. मुलांच्या शाळेत महार, मांग, चांभार आदि अति शुद्रांच्या मुली शिकत. स्त्रियांना शिक्षण देणे हा त्या सनातन्यांच्या दृष्टीने अतिशय भयंकर भ्रष्टाचार होत हे एक त्यांच्या दृष्टीने पातकच होते.[४] परंतु काही काळानंतर अनेक अडचणी येऊन ही शाळा बंद पडली तरी खचुन न जात त्यांनी आपले स्त्री शिक्षणाचे कार्य सुरूच ठेवले.

महात्मा फुल्यांनी ३ जुलै १८५१ रोजी पुण्यात बुधवार पेठेतील आण्णासाहेब चिपळूणकर ह्या नामांकित ब्राह्मणेत्तर गृहस्थांच्या वाड्यात मुलींची शाळा काढली. केशवराव भवाळकर हे जोतीरावांना त्यांच्या शिक्षण कार्यात सहाय्य करीत या सर्वांना हे कार्य पार पाडताना मोठा विरोध झाला होता. हे त्या वेळेचे शिक्षण मंडळाचे (Board of Education) अध्यक्ष जॉन वार्डन यांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे ती शाळा लोकांच्या नजरेआड चालविण्यात येत असे पुढे ५ मार्च १८५२ रोजी वेताळ पेठेत मुलीची तिसरी शाळा काढली. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी ही शाळा तपासून "इतक्या थोड्या वेळेत शाळेने चांगली प्रगती केली हे त्या चालकांना भूषवावह आहे" असा अभिप्राय व्यक्त केला होता.[५]

महात्मा फुल्यांचे हे कार्य इतके उच्च होते की विद्या विभुषित अशा परकिय ब्रिटिश सरकारला त्यांचा गौरव केल्याशिवाय राहवले नाही. त्यावेळीच बोर्ड ऑफ एज्युकेशनचे प्रेसिडेंट सर आस्कीन पेरी साहेब हे होते. सरकारचे बडे ऑफिसर या नात्याने सरकारात त्याचे मोठे वजन होते. ज्योतिरावांची स्त्री शिक्षणाची पवित्र कामगिरी प्रथम त्यांच्या लक्षात आली व सरकारकडून फुल्यांचा योग्य गौरव होऊन त्यांना प्रोत्साहन देण्यात यावे म्हणून या साहेबांनी मुंबई सरकारात तसे लिहिले त्या लिहिण्याचा परिणाम असा झाला की, सन १८५२ साली मुंबई इलाख्याचे गव्हर्णर साहेब पुण्यास आले त्यावेळी त्यांनी पण विश्राम बागेत एक दरबार भरवून ज्योतीरावांना सरकार मार्फत दोनशे रूपये किंमतीची एक शाल अर्पण केली व त्यांचा गौरव केला.[६] या संदर्भात २ जून १८५२ च्या अंकात 'पुना ऑब्झर्वर' म्हणतो आपल्या देश बांधवांच्या उद्धारासाठी ज्योतिबांनी जे महान प्रयत्न चालविले आहेत व स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी जे प्रशंसनीय कार्य केले आहे त्या विषयी सरकारकडून त्यांना २०० रूपये किंमतीची शाल बक्षीस मिळणार आहे. त्याप्रमाणे पुणे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर थॉमस कॅंडी यांनी सरकारच्या आज्ञेप्रमाणे जोतीरावांच्या गौरवार्थ विश्रामबाग वाड्यात १६ नोव्हेंबर १८५२ रोजी सरदार व प्रमुख लोक यांच्या सभेत ती महावस्त्रे



76

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुरूषास दुसरा नियम लागू करणे हा निव्वळ पक्षपात होय. फुल्यांच्या समकालीन समाज सुधारकांनी स्त्री समस्यांकडे एक प्रकारे 'सहानुभुतीच्याच' दृष्टीकोनातून पाहिले असल्याचे दिसते व स्त्रीयांना शिक्षण देण्याचे समर्थन त्यांनी केले. कारण शिक्षण घेऊन स्त्री आदर्श माता, पत्नी, भगिनी, कन्या बनावी असा त्यांचा हेतू होता. या उलट ज्योतिबा फुल्यांनी स्त्री समस्यांकडे एक मानवी दृष्टीने नव्हे ते जन्मदात्री असल्याने पुरूषाहून श्रेष्ठ आहे आणि मानव म्हणून तीलाही पुरूषाप्रमाणे जे 'मानवी हक्क' आहे ते मिळायलाच हवेत या जाणिवेतून तिच्या हक्काचा लढा ते लढत होते. स्त्रीयांना शिक्षीत करण्यामागे इतर प्रमाणे त्यांची भूमिका पारंपारिक मानसिकतेची नव्हती. शिक्षण हे गुलामी नष्ट करण्याचे हत्यार असल्याचे त्याने वाटत होते.[१] फुल्यांच्या काळात हिंदु शास्त्राप्रमाणे स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. स्त्रियांना शिक्षण दिल्यास त्या वाईट मार्गाला लागतील. त्यांना नीती-अनितीची चाड राहणार नाही. त्यामुळे कुटुंबातील स्वास्थ्य व सौख्य नष्ट होईल. या भितीपोटी स्त्रियांना शिक्षण देणे हे महापाप आहे. त्यामुळे त्या अल्पवयातच विधवा होतील. स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म आणि समाजाशी द्रोह करणे होय. यासारख्या अज्ञान मुलक समजुती समाजात रूढ होत्या. त्या सर्व समजुती विरूद्ध महात्मा फुले यांचे मत होते. शिक्षणाच्या अभावी स्त्रिया ह्या अज्ञानांच्या अंधकारात हजारो वर्षापासून खितपत राहिल्या आहेत. मनुष्याला शिक्षणाने मनुष्यपण प्राप्त होते. यासाठी स्त्रियांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश आणण्याचा ज्योतिबाने ठाम निश्चय केला होता. एक स्त्री शिक्षित झाली तर सारे कुटुंब शिक्षित होते हे ओळखून ज्योतिबांनी मुलींची शाळा काढण्याचे ठरविले.[२]

महात्मा फुल्यांच्या काळात स्त्री ही सामाजिक व मानसिक गुलामगिरीत अडकलेली होती. स्त्रीयांना या गुलामगिरीतून मुक्त करावयाचे असेल तर तिला आतापर्यंत बंद असलेल्या शिक्षणाचे दरवाजे उघडले गेले पाहिजे हे फुल्यांनी ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी सन १८४८ साली ऑगस्ट महिन्यात बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात मुलीची पाहिली शाळा सुरू केली आणि स्त्री शिक्षणाला विशेष महत्त्व दिले होते. "स्त्री शिक्षित झाली तर तिचा उद्धार होईल, आत्मप्रतिष्ठा लाभेल व मानसिक गुलामगिरीतून तिची मुक्तता होईल" असा विचार महात्मा फुले यांनी केला होता. स्त्री शिक्षणाचे महत्त्व सांगताना महात्मा फुले म्हणतात, "स्त्रियांच्या शाळेने प्रथम माझे लक्ष वेधले पूर्ण विचारात माझे असे मत झाले की पुरूषाच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची अधिक आवश्यकता आहे. मुलांच्या भवितव्याचे मार्गदर्शन मातांकडून व्यवस्थित होऊ शकते. स्त्रियांना आपल्या कर्तव्याची जाणीव झाली तर देशाची प्रगती झपाट्याने होईल असे महात्मा फुले यांना वाटल्यामुळे त्यांनी स्त्री शिक्षणावर विशेष भर दिला."[३] आपल्या शिक्षण कार्यात आपली पत्नी सावित्रीबाई हिचे सहाय्य व्हावे म्हणून फुल्यांनी त्यांचेही शिक्षण सुरू केले आणि वरीलप्रमाणे कनिष्ठ वर्गाच्या मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. या मुलींच्या शाळेत ज्या मुलांना शिक्षणाची आवड असेल त्यांनाही प्रवेश दिला. त्या शाळेत वाचन, अंक गणित आणि व्याकरणाची मुलतत्वे हे विषय शिकविले जात असत. जोतीरावांचे सहकारी सखाराम, यशवंत परांजपे, सदाशिव गोविंद हारे व सदाशिवराव गावंडे हे त्यांना वरील शाळा चालविण्यासाठी आर्थिक सहाय्य करीत असत. पुणे हे सनातण्यांचा बालेकिल्ला होता. मुलांच्या शाळेत महार, मांग, चांभार आदि अति शूद्रांच्या मुली शिकत. स्त्रियांना शिक्षण देणे हा त्या सनातन्यांच्या दृष्टीने अतिशय भयंकर भ्रष्टाचार होत हे एक त्यांच्या दृष्टीने पातकच होते.[४] परंतु काही काळानंतर अनेक अडचणी येऊन ही शाळा बंद पडली तरी खचुन न जाता त्यांनी आपले स्त्री शिक्षणाचे कार्य सुरूच ठेवले.

महात्मा फुल्यांनी ३ जुलै १८५१ रोजी पुण्यात बुधवार पेठेतील आण्णासाहेब चिपळूणकर ह्या नामांकित ब्राह्मणेत्तर गृहस्थांच्या वाड्यात मुलींची शाळा काढली. केशवराव भवाळकर हे जोतीरावांना त्यांच्या शिक्षण कार्यात सहाय्य करीत या सर्वांना हे कार्य पार पाडताना मोठा विरोध झाला होता. हे त्या वेळेचे शिक्षण मंडळाचे (Board of Education) अध्यक्ष जॉन वार्डन यांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे ती शाळा लोकांच्या नजरेआड चालविण्यात येत असे पुढे ५ मार्च १८५२ रोजी वेताळ पेठेत मुलीची तिसरी शाळा काढली. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी ही शाळा तपासून "इतक्या थोड्या वेळेत शाळेने चांगली प्रगती केली हे त्या चालकांना भूषवावह आहे" असा अभिप्राय व्यक्त केला होता.[५]

महात्मा फुल्यांचे हे कार्य इतके उच्च होते की विद्या विभुषित अशा परकिय ब्रिटिश सरकारला त्यांचा गौरव केल्याशिवाय राहवले नाही. त्यावेळीच बोर्ड ऑफ एज्युकेशनचे प्रेसिडेंट सर आस्कीन पेरी साहेब हे होते. सरकारचे वडे ऑफिसर या नात्याने सरकारात त्याचे मोठे वजन होते. ज्योतिरावांची स्त्री शिक्षणाची पवित्र कामगिरी प्रथम त्यांच्या लक्षात आली व सरकारकडून फुल्यांचा योग्य गौरव होऊन त्यांना प्रोत्साहन देण्यात यावे म्हणून या साहेबांनी मुंबई सरकारास तसे लिहिले त्या लिहिण्याचा परिणाम असा झाला की, सन १८५२ साली मुंबई इलाख्याचे गव्हर्णर साहेब पुण्यास आले त्यावेळी त्यांनी पण विश्राम बागेत एक दरबार भरवून ज्योतीरावांना सरकार मार्फत दोनशे रूपये किंमतीची एक शाल अर्पण केली व त्यांचा गौरव केला.[६] या संदर्भात २ जून १८५२ च्या अंकात 'पुना ऑब्झर्वर' म्हणतो आपल्या देश बांधवांच्या उद्धारासाठी ज्योतिबांनी जे महान प्रयत्न चालविले आहेत व स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी जे प्रशंसनीय कार्य केले आहे त्या विषयी सरकारकडून त्यांना २०० रूपये किंमतीची शाल बक्षीस मिळणार आहे. त्याप्रमाणे पुणे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर थॉमस कँडी यांनी सरकारच्या आज्ञेप्रमाणे जोतीरावांच्या गौरवार्थ विश्रामबाग वाड्यात १६ नोव्हेंबर १८५२ रोजी सरदार व प्रमुख लोक यांच्या सभेत ती महावस्त्रे



76

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner